# पुणे मेट्रो स्थानकांमध्ये शंभराव्या एस्किलेटर बसविण्याचे काम पूर्ण

**दिनांक ०९/१२/२०२२**



पुणे मेट्रोचे पिंपरी चिंचवड महानगरपालिका स्थानक ते स्वारगेट स्थानक (१७ किमी) आणि वनाझ स्थानक ते रामवाडी स्थानक (१६ किमी) असे ३३ किमी लांबीचे २ मार्ग आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिका स्थानक ते फुगेवाडी (७ किमी) आणि वनाझ ते गरवारे (५ किमी) या मार्गांचे उदघाटन दिनांक ६ मार्च २०२२ रोजी मा. पंतप्रधान यांचे हस्ते होऊन तो प्रवाश्यांसाठी खुला करण्यात आला. आजमितीस पुणे मेट्रोचे ८५% काम पूर्ण झाले असून येत्या काही महिन्यात उर्वरित काम पूर्ण होऊन ते प्रवाश्यांसाठी खुले करण्यात येतील. पुणे मेट्रोची स्थानके अद्ययावत असून त्यात लिफ्ट (उद्‌वाहक), एस्किलेटर (सरकते जिने) आणि जिने हे भविष्यात होणाऱ्या प्रवासी वाढीचा विचार करून बनविण्यात आले आहेत. आज दिनांक ९ डिसेंबर २०२२ रोजी शंभरावे एस्किलेटर बसविण्याचे काम पूर्ण झाले. हा एस्किलेटर दापोडी स्थानकावर बसनविण्यात आला. अत्यंत गर्वाची बाब म्हणजे हे बसविण्यात आलेले शंभर एस्किलेटर ‘मेक इन इंडिया’ धोरणांतर्गत पुण्यात तयार झालेले आहेत.

लिफ्ट आणि एस्किलेटरमुळे प्रवाश्याना वेगाने मेट्रो स्थानकातील कोनकोर्स मेट्रो फलाटावर जाणे-येणे शक्य होते. त्यामुळे कोठेही गर्दी न होता सुलभ रीतीने मेट्रो प्रवास करता येतो. जेष्ठ नागरिक आणि दिव्यांगजन यांच्यासाठी या गोष्टी अत्यावश्यक आहेत. लिफ्ट व एस्किलेटरमुळे दिव्यांगजन व जेष्ठ नागरिक कोणाच्याही मदतीशिवाय मेट्रोस्थानकावर जाऊन ट्रेनमध्ये प्रवास करू शकतात. मेट्रो स्थानकांवर दोन्ही बाजूला लिफ्टची व्यवस्था केल्यामुळे व्हीलचेअर वापरणारे दिव्यांगजन कोणाच्याही मदतीशिवाय सहजरित्या मेट्रो प्रवास करू शकतात.

पुणे मेट्रोची सर्व स्थानके मिळून १६६ एस्किलेटर बसविण्यात येणार आहेत. त्यापैकी शंभराव एस्किलेटर आज बसविण्यात आला. हा एस्किलेटर शिंडलर कंपनीच्या पुण्यातील कारखान्यात तयार करण्यात आला आहे. उर्वरित एस्किलेटर बसविण्याचे काम वेगाने सुरु आहे. पुणे मेट्रो प्रकल्पात एकूण १३७ लिफ्ट बसविण्यात येणार असून त्यापैकी ७१ लिफ्ट बसविण्यात आल्या आहेत. ८ लिफ्ट बसविण्याचे काम वेगाने सुरु आहे. उर्वरित लिफ्ट टप्पा टप्प्याने बसविण्यात येतील.

याप्रसंगी महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. ब्रिजेश दीक्षित यांनी म्हंटले आहे की, “पुणे मेट्रोची स्थानके हि अत्याधुनिक असून जागतिक दर्जाची मानांकनानुसार असून त्यामध्ये लिफ्ट, एस्किलेटर व जिन्याचे प्रावधान करण्यात आले आहे. प्रवाश्यांना जलद रीतीने ट्रेनमध्ये बसणे व ट्रेनमधून बाहेर पाडण्यासाठी या सुविधा अत्यंत्य गरजेच्या असतात. आज बसविण्यात आलेला शंभरावा एस्किलेटर हा भारतात आणि पुणे शहरात बनविण्यात आला आहे, हा एक वेगळाच योग आहे.”

